# कानोकानी

## बासुंदी आणि बत्तासे

दिवाळी अंकातील साहित्य म्हणजे बऱ्याचदा त्याच त्या चकल्या, तेच ते अनारसे आणि त्याच त्या करंज्या असतात. चांदीच्या ताटात लाह्या बत्तासे, चणे फुटाणेच जास्त हाती लागतात. कथांचं कुथणं, कादंबऱ्यांचं जांभई देणं, कवितांचा 'लडिवाळ मुरका नाहीतर सुतकी हुंदका', आणि 'शिळा विषय-नव्या रेषा' 'छापाची व्यंगचित्रं असाच 'साहित्य सहवास' वाचकांना बव्हंशी घडतो. या वाङ्मय गंगेत अनेक भोवरे, तुंबारे, फुटकी गटारे तसेच नवे धुमारेही आढळतात. 'तुम्ही आम्ही आपण सगळेच' (संपा. : अविनाश धर्माधिकारी) हा अंक '२१ व्या शतकाकडे जाताना भारत-युवकाच्या नजरेतून' या विषयाला वाहिलेला आहे. १० ते ३१ ऑगस्ट या काळात ४० तरुणांनी देशातील विविध राज्यांचा दौरा करून आपले अनुभव मांडले आहेत. विजय नवले व अविनाश निकम या दोघांनी बिहारचा मुबलक 'चारा' सादर केला आहे. पाटण्यात ते जिथे उतरले होते तेथे रात्री ८-३० च्या सुमारास फटाक्याचे आवाज कानी आले. पण 'ये पटाखा नहीं, गोलीकी आवाज है' असं तेथील सहकाऱ्यानं सांगितले. दुसऱ्या दिवशी एका दुकानदाराला कालच्या गोळीबाराबद्दल त्यांनी विचारलं तेव्हा तो मख्खपणं म्हणाला, 'दो मर्डर हुऐ । दोपहरमें उनकेही आदमीने यहींपरही एक खून किया था ।उसकाही बदला ले लिया । काम खत्म.'' पाटण्यात रोज एकतरी मर्डर होतोच तरी ते बिहारमधील सर्वात सुरक्षित शहर मानले जाते. लोकात नागरी जबाबदाऱ्यांची काही जाणीवच नाही. बसमध्ये एक वयस्क माणूस तिकीटच काढायला तयार नव्हता. कारण कॉलेजात शिकणाऱ्या आपल्या मुलाला फुकट पास आहे म्हणून मीही फुकटच जाणार, असा त्याचा आग्रह होता. हे दोघे लालूप्रसाद माखना सुरक्षेच्या कमानी ओलांडून भेटायला गेले. ''अतिशय निर्विकार चेहरा, पायांनी हालचाल करत होते. लालूंनी आमच्याकडे हलकासा कटाक्ष टाकला पण पुढे काहीच नाही.'' 'लालूजी विश्राम कर रहे है, कल सुबह आओ' असं सांगून त्यांची बोळवण करण्यात आली, एकूणच या अंकातील हा उपक्रम म्हणजे नव्या पिढीच्या स्पंदनांचा मागोवा आहे. धर्माधिकारी यांनी स्वतः 'साप्ताहिक सकाळ' (संपा. : सदा डुंबरे) दिवाळी अंकात 'पहिल्या निवडणुकीचा अनुभव' हा लेख लिहिला आहे. अण्णा हजारे, टी. एन. शेषन यांनी निवडणूक प्रचाराला येतो असं सांगून टाळाटाळ कशी केली, भाजपचे माजी आमदार अरविंद लेले, संजय नहार यांनी आधी पाठिंबा दिला, पण नंतर पाठ फिरवून सुरेश कलमाडींना पाठिंबा कसा जाहीर केला आदि तपशील खळबळजनक वाटेल. पण मुळात धर्माधिकारी काही एवढे 'नवशिके' नाहीत की त्यांना राजकारणी मंडळींचे हे रंगढंग ठाऊक नसावेत ! आपणच तेवढे सुपर सर्फ आहोत असा अविर्भाव ते घेतात पण त्यांचीही अवस्था 'ढूँढतेही रह जाओगे' अशी व्हायची !